


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ११४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.०६ डिसेंबर २०२४


## ...आणि म्हणून.... मी पुन्हा आलोय !

# देवेंद्र फडणवीस पुन्हा आलेच अन मुख्यमंत्री झालेच!



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, मुंबई :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईतल्या आझाद मैदान या ठिकाणी दिमाखादार सोहळ्यात शपथ घेतली. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह विविध राजकीय आणि मनोरंजन क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी मंचावर उपस्थित झाल्यानंतर ५ वाजून ३१ मिनिटांनी देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ देण्यात आली.

**देवेंद्र फडणवीस यांनी काय शपथ घेतली?**

मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस ईश्वरसाक्ष शपथ घेतो की कायद्याद्वारे स्थापित झाले आहे अशा भारताच्या संविधानाबाबत मी खरी श्रद्धा आणि निष्ठा बाळगेन. मी भारताची सार्वभौमता आणि एकात्मता उन्नत राखेन. मी महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री म्हणून माझी कामे निष्ठापूर्वक आणि सद्सद्विवेक बुद्धीने पार पाडेन आणि संविधान आणि कायदा यानुसार सर्व तऱ्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निःपक्षपातीपणे तसेच कुणाविषयीही ममत्व भाव किंवा आकस न बाळगता न्याय्य वागणूक देईन.

**आणखी काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?**

मी, देवेंद्र सरीता गंगाधरराव फडणवीस ईश्वरसाक्ष शपथ घेतो की महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतो माझ्या विचारार्थ आणली जाईल किंवा मला ज्ञात होईल अशी कोणतीही बाब असा मुख्यमंत्री म्हणून माझी कामे यथायोग्य पार पाडण्यासाठी हे खेरीज करुन मी कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तिंना कळवणार नाही किंवा त्यांच्याकडे उघड करणार नाही. अशी शपथ देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीनंतर एकच जल्लोष पाहण्यास मिळाला. या शपथविधीनंतर देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोघांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे.

**महाराष्ट्रात महायुतीला महाप्रचंड यश**

महाराष्ट्रात महायुतीला निवडणुकीत महाप्रचंड यश मिळालं. २३७ जागांवर महायुतीला यश मिळालं आहे. २३ तारखेला निकाल लागल्यानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी कोण विराजमान होणार? यावर बराच खल झाला. त्यानंतर ४ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांचं नाव निश्चित झालं. आज देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वाचं वक्तव्य



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, मुंबई :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही वेळापूर्वीच पत्रकारांशी संवाद साधला आणि मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्याच पत्रकार परिषदेला संबोधित केलं. विधीमंडळ आणि मंत्रालय पत्रकार संघातर्फे देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरंही दिली. लाडकी बहीण योजनेबाबत देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे.

**काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?**

एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातलं महायुतीचं सरकार हे गतिशील असं सरकार होतं. आज आमची जी जाहिरात होती की महाराष्ट्र आता थांबणार नाही. त्याबाबत मला विचारलं की महाराष्ट्र आता थांबणार नाही म्हणजे काय त्यावर मी सांगितलं की महाराष्ट्राच्या विकासाने मागच्या अडीच वर्षात गती घेतली आहे. ही गती आता तशीच पुढे नेऊ. आता महाराष्ट्र थांबणार नाही. पायाभूत क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, उद्योग क्षेत्र प्रत्येक क्षेत्रात महाराष्ट्र अग्रणी राहिल असं मी आपल्याला सांगू इच्छितो असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**महायुतीतल्या आमच्या भूमिका बदलल्या आहेत-देवेंद्र फडणवीस**

महायुतीतल्या आमच्या भूमिका बदलल्या आहेत एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते, मी आणि अजित पवार हे उपमुख्यमंत्री होतो. २०१९ ला ७२ तासांसाठी मी आणि अजित पवार उपमुख्यमंत्री होतो. आता पुन्हा मी मुख्यमंत्री आहे आणि अजित पवार, एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री आहेत.

आमचे रोल बदलले असले तरीही दिशा ती राहणार आहे, गती तिच राहणार आहे. आमची जी पहिली मंत्रिमंडळाची बैठक झाली त्या बैठकीत आम्ही तिघांनीही अधिकाऱ्यांना सांगितलं की मागच्या काळात आम्ही आलो तेव्हा ५० ओव्हरची मॅच होती, अजित पवार आले तेव्हा २०-२० ची मॅच झाली, आता टेस्ट मॅच आहे त्यामुळे सगळे निर्णय योग्यपणे घेऊन आणि पुढची पायाभरणी योग्य प्रकारे करत आपल्याला वाटचाल करायची आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे

**लाडकी बहीण योजनेबाबत काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?**

लाडकी बहीण योजना आम्हीच सुरुच ठेवणार आहोत. तसंच २१०० रुपयेही आम्ही देणार आहोत. आता अर्थसंकल्पात त्याचा विचार आम्ही करु. आपले जे आर्थिक स्रोत चॅनलाईझ्ड झाल्यानंतरच हे करणं शक्य आहे. जी आश्वासनं दिली आहेत ती आश्वासनं पूर्ण करु त्याकरिता ज्या व्यवस्था करायच्या आहेत त्या आम्ही आधी करणार आहोत. स्क्रुटिनी म्हणजेच पडताळणीचा जोपर्यंत प्रश्न आहे त्यात इतकंच आहे की निकषांबाहेर जर कुणी घेतलं असेल किंवा काही तक्रारी आल्या आहेत त्यावर आमचं लक्ष असेल. शेतकरी सन्मान योजना जेव्हा पंतप्रधान मोदींनी सुरु केली तेव्हा पहिल्या टप्प्यात असं कळलं की काही मोठ्या शेतकऱ्यांनाही ते मिळालं आहे. त्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी स्वतःच सांगितलं की आम्ही निकषात बसत नाही. अशाच पद्धतीने लाडकी बहीण योजनेत निकषांच्या बाहेरच्या काही बहिणी मिळाल्या तर त्याचा पुनर्विचार होईल पण सरसकट पुनर्विचार केला जाणार नाही. असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**विधानसभा अध्यक्षांची निवड मुंबईतच केली जाईल**

विधानसभा अध्यक्षांची निवड मुंबईच्या अधिवेशनात केली जाईल कारण नियमच असा आहे की शपथविधी झाल्यानंतर विधानसभेच्या अध्यक्षांची निवड करावी लागते. त्यामुळे ती प्रक्रिया आता सुरु होईल ७, ८ आणि ९ डिसेंबर या तीन दिवसांमध्ये शपथविधी व्हावेत आणि त्यानंतर ९ तारखेला अध्यक्षांची निवड करावी आणि राज्यपालांनी अभिभाषण करावं. मंत्रिमंडळाच्या संदर्भात इतकंच सांगेन की जवळपास आमची प्रक्रिया झाली आहे. नागपूर अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळ विस्तार होईल असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## दिव्यात धक्कादायक प्रकार !

### शाळकरी मुलीचा वर्गात विनंयभंग



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील स्मार्ट एज्युकेशन या शाळेत ५ वी शिकणाऱ्या मुलीचा विनयभंग एका विकृत व्यक्ती कडून वर्गात घुसून करण्यात आला. हा प्रकार काल शाळेच्या वर्गात घडल्यानंतर शाळेने हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. पण पालकांनी मुंब्रा पोलीस स्टेशनला याची तक्रार केल्यानंतर पोलिसांनी अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला.

पण शाळेच्या विरोधात कुठलीही कारवाई पोलिसांनी न केल्याने दिवा मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांची भेट घेवून शाळेच्या संस्था संचालकां विरोधात आणि मुख्याध्यापकां विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्याची मागणी केली. अखेर मुख्याध्यापिका संगीता तिवारी हिला अटक करण्यात आली आहे.

यावेळी उपस्थित मनसे पदाधिकारी शहर सचिव प्रशांत गावडे, मनवीसे शहर अध्यक्ष कुशाल पाटील, विभाग सचिव परेश पाटील, शाखाध्यक्ष सागर निकम, नम्रता खराडे उपस्थित होते.

## मुंबई पोलिसांवर अंबिवली गावात दगडफेक



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, मुंबई :** सोनसाखळी चोराला अटक करण्यासाठी गेलेल्या मुंबई पोलिसांच्या पथकावर आंबिवली रेल्वे स्थानकाजवळ दगडफेक करण्यात आली. सोनसाखळी चोराला पोलिसांच्या तावडीतून सोडवण्यासाठी ही दगडफेक करण्यात आली असून त्यात सहाय्यक पोलीस निरीक्षकासह दोन पोलीस जखमी झाले आहेत. या प्रकरणी चार जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्यावर खडकपाडा पोलिसांनी विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

अंधेरी येथील एमआयडीसी पोलीस ठाण्याचे एक पथक सोनसाखळी चोराच्या शोधात कर्जतपासून सुमारे ६ किमी अंतरावरील आंबिवली गावात गेले होते. बुधवारी रात्री साडेनऊच्या सुमारास आंबिवली रेल्वे स्थानकाजवळ या आरोपीच्या साथीदारांबरोबर पोलिसांची झटापट झाली. सोनसाखळी चोराचे साथीदार त्याला सोडण्यासाठी पोलिसांवर दबाव टाकत होते. त्यावेळी पोलिसांनी आंबिवली रेल्वे स्थानकाच्या कार्यालयात आसरा घेतला, मात्र जमावाने त्यांचा पाठलाग केला व आरोपीला सोडवण्याचा प्रयत्न केला. काही वेळातच आजूबाजूने लोक जमा झाले. त्यांनी जमाव करून थेट पोलिसांवर दगडफेक करण्यास सुरूवात केली. या घटनेची चित्रफीत समाज माध्यमांवर चांगलीच व्हायरल झाली आहे. या चित्रफितीत जमाव रेल्वे रुळांवरील दगड उचलून पोलीस व रेल्वे कर्मचाऱ्यांच्या दिशेने फेकताना दिसून येत आहे. जमावात महिलांचाही समावेश होता. त्याही अटक केलेल्या आरोपीला सोडवण्याचा प्रयत्न करताना दिसत होत्या.

या घटनेत रेल्वेचे मालमत्ता नुकसान झाले असून रेल्वे स्थानकातील काचाही फुटल्या आहेत. सुदैवाने या दगडफेकीमुळे रेल्वे वाहतुकीवर कोणताही परिणाम झाला नाही, पण या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनास्थळ हे ठाणे पोलीस हद्दीत असल्याने पुढील तपास ठाणे पोलिसांकडून केला जात आहे, असे रेल्वे पोलिसांनी सांगितले. खडकपाडा पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या १०९, १३२, १२१, ३५२ आणि ३५१ कलमांखाली ३०-३५ अज्ञात दगडफेक करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला असून चार जणांना अटक केली आहे. सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, इतर आरोपींची ओळख पटवण्याचे काम सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. आंबिवली गावात या आधीही अशा घटना घडल्या आहेत, पोलिसांच्या वाहनांवर दगडफेक करून आरोपींना अटक होण्यापासून वाचवण्याचा प्रयत्न तिथे करण्यात आला आहे. पोलिसांनी या पूर्वीही येथील परिसरात कारवाई करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु ते अपयशी ठरले. त्यामुळे आरोपींना अटक करण्यासाठी पोलिसांना विशेष काळजी घेऊन तेथे जावे लागते.

## पारनेर रहिवासी संघ वतीने नवी मुंबईत आ.काशिनाथ दातेंचा भव्य नागरी सत्कार

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.५, अहिल्यानगर :** नुकत्याच पार पडलेल्या पारनेर मतदारसंघातील विधानसभा निवडणुकीत अटीतटीचा सामना पहायला मिळाला. प्रत्येक जण आपापल्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी नाना तऱ्हेचे प्रयत्न करत होते.

असाच आगळावेगळा प्रयत्न पारनेरकर रहिवासी मित्र मंडळ कामोठे,नवी मुंबई यांनी अगोदरही केला होता व यावेळीही करून दाखवला आहे. पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून काशिनाथ दाते यांची निवड झाली. या निवडीचे मतदारसंघात व पारनेर तालुक्यात ठीक ठिकाणी स्वागत करण्यात येत आहे. पारनेर तालुक्यातील रहिवासी नवी मुंबई कामोठे येथे पारनेरकर मित्रमंडळाच्या वतीने आमदार काशिनाथ दाते यांचा भव्य नागरी सत्कार रविवार दि.८ डिसेंबर रोजी सायंकाळी सात वाजता श्री संत शिरोमणी तुकाराम महाराज मंदिर, सेक्टर ३६, कामोठे,नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती पारनेरकर रहिवासी मित्र मंडळ, मुंबई यांनी दिली. या कार्यक्रमासाठी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, पारनेर नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष विजय औटी, भाजप कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, जिल्हा बँकचे संचालक प्रशांत गायकवाड, माजी सभापती मधुकर उचाळे, भाजपचे पारनेर तालुका अध्यक्ष राहुल पाटील शिंदे, भाजप नेते वसंतराव चेडे, सचिन पाटील वराळ, माजी सभापती गणेश शेळके, नगरसेवक युवराज पठारे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**आ. काशिनाथ दाते यांची पेढे तुला !**

नवनिर्वाचित आमदार काशिनाथ दाते यांची निवड झाल्याबद्दल रविवारी सायंकाळी भव्य मिरवणूकीने स्वागत करण्यात येणार असून कामोठे नवी मुंबई येथे जवळच सर्वच पारनेर तालुक्यातील रहिवासी आहेत.

कामोठेकर ज्या उमेदवाराला पाठिंबा देतात तोच आमदार होत असून यावेळीही संपूर्ण कामोठे मुंबईकर काशिनाथ दाते सर यांच्या मागे ठामपणे उभे राहिले असल्याचे आयोजक यांनी सांगितले. या कार्यक्रमानिमित्ताने पारनेरकर तालुक्यातील रहिवासी नवी मुंबई कामोठे येथे उद्योजक संजय आहेर ग्राम पंचायत सदस्य पळसपूर व प्रसिद्ध गाडा मालक उद्योजक संतोष चौगुले यांच्या वतीने नवनिर्वाचित आमदार काशिनाथ दाते सर यांची भव्य पेढे तुला आयोजित करण्यात आली असून नगर व नवी मुंबई कामोठे येथिल महायुतीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचेही आयोजक यांनी यावेळी सांगितले.

अक्षराज

# संपादकीय



## माझे भीमबाबा

डॉ.बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने त्यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनांतून बहुजन समाजक्रांतीचे स्फुलींग चेतविले. त्यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले. बाबासाहेब म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय. ते नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मानव मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्रय आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले. रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्रीवर्गाच्या, शेतकरी-मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखवली. मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीयच नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार तथा भारताच्या राष्ट्रीय ग्रंथ- संविधानाचे ग्रंथकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी दि.१४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते दांपत्य दक्ष असत. स्वतःसह भीमरावांना वाचनाची खुप आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. वडील रामजी हे मुलांनाही चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते. जगद्गुरू संत तुकारामजी व संतशिरोमणी कबीर हे बाबासाहेबांच्या भावी आयुष्यात अभ्यासाचे विषय झालेले दिसतात.

**शैक्षणिक विचार :** शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी, यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो माणूस प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही,'' असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. ''प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे. त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणार्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन इ.स.१९४६ साली करून त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय, असे ते मानत.

**प्रखर राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा :** डॉ. बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती. डॉ.आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तात्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली. त्यांना वाटले, डॉ.आंबेडकर आता देश सोडून जाणार की काय? परंतु या महामानवांनी निक्षून सांगितले, ''आम्ही या भारत देशाची संतान आहोत. आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच. राष्ट्रावर संकट आल्यास प्राण पणाला लावून देशाचे रक्षण केले व पुढेही करूच!'' यात डॉ.आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा सामावलेली दिसून येते.

# महिलांचे उध्दारकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर



**आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन. आजच्याच दिवशी सण १९५६ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर आपल्या लाखो अनुयायांना दुःखसागरात लोटून कायमचे निघून गेले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन!**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले ते तर सर्वानाच माहीत आहे पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी जे कार्य केले ते खूप कमी लोकांना माहीत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उध्दारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहीतही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलामाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते. मातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेल. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की जे त्यांना हजारो वर्ष आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमुळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्वास घेत आहेत तो केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८ मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मुलं केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. खान कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषां इतकिच मजुरी, बहूपत्नीत्वला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी महिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, महिलांना पगारी प्रसूती रजा, २० वर्ष सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूर मंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण कॉंग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली. देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले. हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात महिलांचा समावेश होता मग ते १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो. १९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न हे मुलीच्या प्रगतीत अडसर ठरू नये. मुलीवर लग्न लादू नये ते तिच्या संमतीनेच व्हावे. लग्नानंतर बायको ही नवऱ्याची गुलाम नको मैत्रीण बनायला हवी. पतीच्या संपत्तीत पत्नी देखील समान वाटेकरी आहे. पत्नीच्या सुरक्षेची जबाबदारी पतीची असून तिला शारीरिक किंवा मानसिक त्रास जर पतीने दिला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हायला हवी असे त्यांचे मत होते. भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४, १५, १५(३), १६(२), ३९(क), ३९(घ), ३९(ड), ४२, ३२५ इत्यादी कलमांचा अंतर्भाव करून महिलांचे हित व कल्याण जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने देशातील महिला आजही बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. बाबासाहेबांनी महिलांसाठी इतके करून ठेवले आहे की अनेक जन्म घेऊनही हे उपकार फिटनार नाही.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# बालकांमध्ये आतड्यांचा कृमी दोषावर पालिकेकडून जंत नाशक गोळया वाटप

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०४, मिरा भाईंदर :** जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार भारतात १ ते १९ वर्षे वयोगटातील किमान २४१ दशलक्ष(६८%) बालकांमध्ये आढळणारा आतडयांचा कृमीदोष (पोटातील जंत) हा मातीतून प्रसारित होणाऱ्या जंतामुळे होतो. जगात २८ टक्के बालकांना असा कृमीदोष होण्याची शक्यता असते.याचे प्रमुख कारण म्हणजे वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचा अभाव असणे हे आहे. या कृमीदोषांचा संसर्ग दुषित मातीच्या संपर्कात आल्यामुळे होतो. जंतदोष म्हणजे खानपानव्दारे विविध प्रकारचे जंतू लहान मुलांच्या पोटात जातात. या जंतुमुळे अन्नातील पौष्टीक सत्त्वे मुलांच्या शरीराला पुरेशी प्रमाणात मिळत नाहीत. यामुळे मुलं सतत आजारी पडतात. बाळाची



शारिरिक व बौध्दिक वाढीचा विकास खुंटतो. परिणामी शाळांमधील मुलांच्या उपस्थितीचे प्रमाण कमी होऊ लागते. हे जंतू विष्ठेव्दारे बाहेर पडू लागतात. याकरीता परिसरातील स्वच्छतेसोबतच मुलांनी खाण्यापूर्वी हात धुण्याच्यापध्दती अंगीकृत करणे आवश्यक आहे.

शासन आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुलामुलींना शाळा व अंगणवाडी स्तरावर जंतनाशक गोळया देऊन दि.०४/१२/२०२४ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन व शिल्लक राहिलेल्या लाभार्थ्यांना दि.१०/१२/२०२४ रोजी गोळया देऊन मॉप अप मोहीम राबविण्यात येणार आहे. राष्ट्रीय जंतनाशक दिनाचा उद्देश हा १-१९ वर्षे वयोगटातील सर्व शालेय वयोगटातील विद्यार्थी (पटावर असलेली व पटावर नसलेली/ शाळेत न जाणारी सर्व १९ वर्षापर्यंतची मुले व मुली) यांना शाळा व अंगणवाडी केंद्र स्तरावर जंतनाशक गोळी देवून त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे हा आहे.

या मोहिमेचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याच्या नियोजनाकामी दि. २७/११/२०२४ रोजी शहर टास्क फोर्स सभा घेण्यात आली. सदर सभेत मोहिमेची यशस्वी अंमलबजावणी करणेदृष्टीने कार्यक्षेत्रातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचणे आवश्यक असल्याने आरोग्य केंद्रस्तरावर सूक्ष्मकृती आराखडा तयार करणे, मोहिमेची जनजागृती करणे, मुलांना आरोग्य शिक्षण देणे, अंगणवाडी व शाळास्तरावर गोळया वाटप नियोजन करणे, आपत्कालीन कक्ष तयार करणे, लाभार्थ्यांना गोळया घेणेस प्रवृत्त करणेकरीता कार्यक्षेत्रातील खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग घेणे इ. सूचना देण्यात आल्या.

तरी सदर मोहीम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पालकांनी जास्तीतजास्त सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

## बाबासाहेब..

होई उत्कर्षमार्गस्थ
समस्त दीन दलीत
भिमरावाचा संघर्ष
प्रत्यक्षात ये फलीत

हादरून गेले क्षणी
मस्तावलेविस्तापीत
अंधारमय जीवनास
प्रज्ञा संदेश समर्पित

शिक्षण द्वारे खोली
बाबा विद्याविभुषीत
प्रेरकतारकउध्दारक
समृद्ध झाले शोषित

नव युगा नीळा सूर्य
डॉक्टर सार्थ प्रेषित
मागास आणला पुढे
प्रगत पथी पददलीत

महिला वर्गा जागृती
आशा हो प्रफुल्लित
धन्यवाद देतात नारी
यशजिंके अस्खलित

वाचनभूक असूनही
न मात्र पुस्तकपंडित
शेवटच्याला शिक्षण
उर्जा झाले अखंडीत

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# RCCPL कंपनीत ४२ वा 'मेटॅलिक माईन सुरक्षा सप्ताह' कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : राजू गागरे**
**दि.०४, झरी (यवतमाळ) :**

४२ व्या मेटॅलिक माइन सेफ्टी महिन्याच्या शेवटचा दिवस समारोप समारंभ आणि बक्षीस वितरण सोहळा-२०२४ (खाण सुरक्षा महासंचालनालयाच्या अधिपत्याखाली) ३० नोव्हेंबर रोजी

मुकुटबनच्या **आरसीसीपीएल प्रायव्हेट लिमीटेड** कंपनी लाइम स्टोन आणि डोलोमाईट माइन्स येथे संपन्न झाला. रामावतार मीना, उपमहासंचालक, माइन सेफ्टी वेस्टर्न रिजन, नागपूर, श्रम आणि रोजगार मंत्रालय, भारत सरकार, हे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमात उपस्थित होते, तर **आरसीसीपीएल प्रायव्हेट लिमीटेडचे** मॅन्यूफॅक्चरिंग आणि प्रोजेक्ट हेड रजत कुमार पुस्ती या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

भारत सरकारच्या खाण सुरक्षा महासंचालकांच्या विशेष ऑपरेशनचा एक भाग म्हणून खाणींमध्ये सुरक्षा आणि कल्याणकारी उपायोजनांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक मेगा इव्हेंट आयोजित केला जातो. **आरसीसीपीएल प्रायव्हेट लिमीटेड** च्या मुकूटबन लाइम स्टोन आणि डोलोमाईट माइनने या मेगा इव्हेंटचे विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमादरम्यान विविध संस्थांकडून मुकुटबन लाइमस्टोनला सर्वोत्कृष्ट पुरस्कार मिळाला.

५०० हून अधिक मालक, अधिकारी,




कुटुंबे व कामगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मुकूटबन स्कूल आणि माईन्स टीमने सुरक्षेविषयी सुंदर संदेश देणारे स्किट, विविध सुरक्षा आणि सीएसआर स्टॉल्ससह केले होते ज्यात सुरक्षा आणि कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीचे संदेश समाविष्ट होते. यंदा नागपूर विभागातील खाण सुरक्षा संचालक कार्यक्रमात उपस्थित होते.

११ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर या कालावधीत साजरा करण्यात आलेल्या सुरक्षा सप्ताहाच्या कार्यक्रमात कार्यक्षेत्रातील एकूण ३३ खाणींनी सहभाग घेतला.

मेसर्स आरसी सीपीएल प्रायव्हेट लिमिटेडच्या मुकूटबन लाइमस्टोन माइनला लार्ज मेकॅनाइज्ड ओपन कास्ट माइन श्रेणीमध्ये एकूण सर्वोत्कृष्ट खाण म्हणून घोषित करण्यात आले आणि विविध श्रेणींमध्ये इतर पुरस्कारही देण्यात आले. या पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन समन्वयक नीरज कुमार, माइन सेफ्टी नागपूर विभाग १ चे संचालक के. रविंदर, खाण सुरक्षा संचालक, नागपूर पश्चिम क्षेत्र १, श्रम आणि रोजगार मंत्रालय, भारत सरकारचे इतर संचालक आणि उपसंचालक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

आयोजन समिति चे यूनिट हेड आणि अध्यक्ष जयंत कांडपाल, ४२वें धातु खान सुरक्षा सप्ताह अंतिम दिवस समारोह व पुरस्कार वितरण -२०२४ कार्यक्रमादरम्यान उपस्थित होते. कलकत्त्यावरून रॉ-मैटेरियल्स चे वरिष्ठ उपाध्यक्ष सूरज गुप्ता आणि आरसीसीपीएल प्राइवेट लिमिटेड मुकुटबन चे अन्य कार्यात्मक प्रमुख कार्यक्रमावेळी उपस्थित होते. ४२ वा धातु खान सुरक्षा सप्ताह अंतिम दिवस समारोह आणि पुरस्कार वितरण -२०२४ घ्या कार्यक्रमावेळी उपाध्यक्ष आणि आयोजन सचिव कृष्णकुमार राठौड़ समारोह उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मानवंदना महामानवाला जाहीर अभिवादन सभा संपन्न




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, परळ (मुंबई) :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा समिती (रजि.) यांच्यावतीने बुधवार दि. ४ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.०० ते १०.०० यावेळेत बी.आय.टी.चाळ क्र. १ परेल याठिकाणी मानवंदना महामानवा ला जाहीर अभिवादन सभा पार पडली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे स्थानिक आमदार अजय चौधरी, माजी आमदार विद्याताई चव्हाण, डॉ.निलेश पावसकर हे उपस्थित होते. तर प्रमुख वक्त्या जयाताई बनसोडे यांनी बाबासाहेबांच्या जीवनपट शब्दांनी प्रकट करुन उपस्थितांना भावूक केले. अगदी विस्तृतपणे बाबासाहेबांची जीवनगाथा आणि माता रमाईचा त्याग याविषयावर आपल्या अभ्यासू वक्तृत्वाने उपस्थितांची मने तर जिंकलीच तसेच शब्दसुमनाने बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना दिली. या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती सूरज भोईर(अध्यक्ष मैत्री संस्था), घनश्याम आंबोकर (अध्यक्ष माणूसकी फाऊंडेशन), अय्युब कुरैशी (ओबीसी नेते) मा. संतोष आंबेकर (ओबीसी नेते), जयभीम कांबळे (सिने दिग्दर्शक, लेखक), सागर सातपुते (सिने अभिनेता) रोहिदास समाजाचे सुभाष आंबोकर हे उपस्थित होते. याकार्यक्रमाचे अध्यक्ष शंकर लोखंडे हे होते. तर सूत्रसंचालन संजय पवार यांनी केले. तसेच याकार्यक्रमाला विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, रहिवाशी तसेच हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्व.रुक्मिणीबाई रायकंठवार यांच्या पुण्यस्मरणार्थ बिलोलीत भव्य किर्तन सोहळा




**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.५, मुदखेड (नांदेड) :** बिलोली येथील प्रसिध्द व्यापारी विठ्ठलराव रायकंठवार यांच्या सौभाग्यवती तथा बिलोली तालुका आडत व्यापारी आसोशियनचे अध्यक्ष अनुदत्त रायकंठवार यांच्या मातोश्री स्व. रुक्मिणीबाई रायकंठवार यांच्या चौथ्या पुण्यस्मरणार्थ सद्गुरु श्री चंद्रशेखर महाराज देगलुरकर यांचे दि.८ डिसेंबर २०२४ रविवार रोजी सायंकाळी ९ : ०० वाजता गांधीनगर बिलोली येथे भव्य किर्तन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. तसेच सायंकाळी ६ ते ९ महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असुन तालुक्यातील व बिलोली शहरातील भाविक भक्तानी संत दर्शनाचा आशिर्वाद व महाप्रसादाचा लाभ घ्यावा आसे रायकंठवार परीवारांच्या वतिने नम्र विनंती करण्यात येते.

## गुडसुर येथे जागतीक मृदा दिवस कार्यक्रमाचे आयोजन



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०५, उदगीर( लातूर) :** आज मौजे गुडसूर येथे कृषि विभाग उदगीर मार्फत ५ डिसेंबर जागतीक मृदा दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमात खरीप २०२४-२५ मध्ये रा कृ वि योजने अंतर्गत काढण्यात आलेल्या माती नमुन्याचा अहवालाचे वाचन करून जमीन आरोग्य पत्रिकेचे वाटप करण्यात आले. तसेच कार्यक्रमास शेख एफ जी कृषि पर्यवेक्षक उदगीर,केंद्रे डी एस कृषी सहायक गुडसुर यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्व, जमीन आरोग्य पत्रिकेनुसार संतूलीत खताचा वापर करणे, एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन, सेंद्रीय शेती बाबत मार्गदर्शन केले. तसेच जागतीक माती दिन प्रतिज्ञेचे वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाला गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महावाचन उत्सवानिमित्ताने विद्यार्थ्यांना वाचनाच्या आवडीच्या दिशेने



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०५, धाराशिव :** आज कळंब येथे लता मंगेशकर शाळेमध्ये महावाचन उत्सवानिमित्ताने चार व पाच या तारखेला. शिक्षणाधिकारी साहेब यांच्या आदेशानुसार वाचन चळवळ तसेच मुलांना वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी. प्रत्येक शाळेमध्ये महावाचन उत्सव साजरा करण्यास सांगितले होते.

त्यांचे आदेशानुसार शाळेमध्ये महावाचन उत्सव साजरा करण्यात आला. महावाचन उत्सव साजरा करण्यासाठी तसेच सारांश लेखन विद्यार्थ्याकडून करून घेण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक दळवी सर तसेच सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले व सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व वाचनातून आनंद मिळवला.

## ज्योतिबाची सावली ... सावित्री माऊली... नाटकाने घडविला इतिहास



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, परतवाडा :** स्त्री शिक्षणाचा आरंभ करणारे भारतीय शिक्षणाचे जनक व समाज सुधारक असलेल्या क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई या दाम्पत्यांच्या संघर्षमय जीवनाचा पट उलडणारी ''ज्योतिबाची सावली... सावित्री माऊली या दोन अंकी नाटकाचा प्रयोग नुकताच येथील वाघामाता संस्थान प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला.

प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांच्या मातोश्री स्व. इंदिराबाई बाबारावजी कडू यांचे स्मरणार्थ हा प्रयोग घेण्यात आला होता. या खुल्या प्रयोगाला जमतेल्या गर्दीने इतिहास घडविल्याच्या उत्स्फुर्त प्रतिक्रिया ऐकायला येत आहे .फुले दाम्पत्यांच्या संघर्षमय जीवनाचा संपूर्ण पट उलगडणाऱ्या या नाट्यकृतीचा शेवटी दाखवल्या गेलेल्या ज्योतिबा फुलेंच्या निर्वाणानंतर उपस्थित हजारों प्रेक्षकांचे डोळे पाणावले गेले. हा प्रसंग पाहून स्वतः बच्चू कडूंनाही गहिवर आवरता आला नाही.

या नाटकाचे लेखन अपूर्वा सोनार यांनी केले असून यात स्थानिक २१कलावंतांनी वेगवेगळ्या भूमिका साकारल्या होत्या. नाटकाचे चरित्रनायक असलेल्या फुलेंची ऐतिहासिक भूमिका लेखक जयकुमार चर्जन तर सावित्रीबाईंची भूमिका या नाटकाच्या निर्मात्या, दिग्दर्शिका अपूर्वा सोनार यांनी साकारली होती . त्याशिवाय जोतिरावांचे वडील गोविंदराव फुलेंच्या भूमिकेत शिक्षक निलेश रसे, लहुजी साळवे - आशीष पटारे,सगुणा आत्या / पाणी मागणारी स्त्री -शीला चर्जन, उस्मानभाई -शिक्षक सचिन करडे, दत्तोपंत - रोशन तडस, वाळवेकर - जय हावरे, फातीमा बेग / लक्ष्मी बाई - अनुराधा भुस्कट, बाळूपंत - राहुल चर्जन, काशीबाई - चित्रा रसे, ब्राह्मण - योगेश रायजादे, यशवंत - प्रथमेश धोटे, मारेकरी - शैलेश काळे / निलेश रसे, गरीब स्त्री - वृंदा तडस, केशवपन स्त्री - कु.तन्वी मासोदकर, बाल यशवंत - ज्ञानेश भुस्कट, सुमनाबाई - वर्षा भुयार आदि कलावंतां या नाटकात काम केले आहे .ॲड दादा टाले यांनी या नाट्यकृतीला प्रासंगिक संगीत दिले तर युवा प्रबोधनकार वैभव निमकर यांनी या संपूर्ण सोहळ्याचे उत्कृष्ठ निवेदन केले होते.

या प्रयोगाला भारवी कलामंचचे अध्यक्ष व जेष्ठ नाटककार अशोक बोंडे, लोक कलावंत कैलाश पेंढारकर, नाटककार चंद्रकांत बहुरुपी,परतवाडयाचे ठाणेदार सुरेश म्हस्के, पं. स. गटविकास अधिकारी सुधीर अरबट, गटशिक्षणाधिकारी राम चौधरी, पोतदारचे प्राध्यापक विनय बनसोड,माजी प्राचार्य राजाभाऊ महाजन,प्रा. डॉ. काशीनाथ बऱ्हाटे, प्रा.डॉ प्रमोद गारोडे,डॉ . प्रभू जवंजाळ, डॉ. वांगे, श्रीकृष्ण गोरडे,कृउबास सदस्य अतुल वाठ, गोगटे ज्वेलर्सचे संचालन विलास गोगटे, पंस विस्तार अधिकारी राजीव खोजरे, सामाजिक कार्यकर्ते भारत थोरात, कांडलीच्या माजी सरपंच सुषमा थोरात,डॉ. हर्षद मडघे, स्वप्नील बोबडे,महात्मा फुले ग्राम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रमोद सोनार, सामाजिक कार्यकर्त्या व प्राचार्या संगीता गोरडे, युवाक्रांती संघटनेचे योगेश पवार, तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष विजय मडघे, समता परिषदेचे राजेश अडगोकर, विनायक गणोरकर आदिसह विविध गाव खेड्यांतून आलेल्या अडीच हजार फुलेप्रेमी महिला पुरुषांनी हजेरी लावली होती.

कलाकारांच्या पाठीशी कायम उभा राहील ! - या प्रयोगाच्या उद्घघाटनपर बोलतांना दिव्यांग मंत्रालयाचे अध्यक्ष बच्चू कडू अतिशय भावूक झाले होते. या शहराला नाट्य चळवळीचा भला मोठा वारसा आहे . हा सांस्कृतिक वारसा राज्यभर नेण्यासाठी नवनवीन कलावंत तयार झाले पाहिजे असे सांगत आम्हीच कुठेतरी कमी पडलो ... यासाठी मी सर्व कलावंतांची माफी मागतो... पदं येतात जातात ... आपण एकत्रितपणे कलेसाठी काम करत राहू . मी कलाकारांच्या पाठीशी सदैव उभा राहीन अशी ग्वाही बच्चू कडू यांनी या प्रसंगी बोलतांना दिली.

## विंग ग्रामपंचायत तर्फे मोफत डोळे तपासणी कॅम्पला ग्रामस्थांचा प्रतिसाद



**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.५, शिरवळ :** विंग ग्रामपंचायत यांच्या वतीने मोफत डोळे तपासणी कॅम्प हा गुरुवार दिनांक ०५ /१२/२०२४ रोजी ग्रामपंचायत कार्यालय विंग येथे घेण्यात आला. पंचवक्र फौंडेशनच्या वतीने गोपालकृष्ण नेत्र चिकित्सालया मॅप्रो फूड पार्क समोर शेंदुरजणे तर्फे मोफत डोळे तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आलेले होते. गावातील ज्येष्ठ नागरिक आणि महिला मंडळ यांनी या शिबिरामध्ये सहभाग घेऊन डोळे तपासणी करून घेतली.तसेच प्राथमिक तपासणी केल्यानंतर ज्या रुग्णांना मोतीबिंदू आहे. त्यांची पुढील तपासणी करण्यासाठी त्यांना गोपालकृष्ण नेत्र चिकित्सालया मॅप्रो फूड पार्क समोर शेंदुरजणे वाई येथील रुग्णलयांमध्ये येण्यास सांगितले. त्याच्यानंतर तपासणी करून ज्याचे प्राथमिक अहवालामध्ये मोतीबिंदू दिसत असेल तर त्यांचे मोतीबिंदू चे ऑपरेशन मोफत करण्यात येणार आहे.असे डॉक्टर अश्विनी परदेशी, ऋतिका जाधवराव यांनी सांगितले आहे.

मोफत डोळे तपासणी व अल्प दरात चष्मे वाटप करण्यात आले. सदर डोळे मोफत तपासणी शिबिराला ग्रामस्थांनी चांगला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमाला ग्रामस्थ व विंग ग्रामपंचायत चे स्वप्निल तळेकर(सरपंच) पूनम तळेकर (उपसरपंच )सर्व ग्रामपंचायत सदस्य,ग्राम सेवक पडळकर एल आर, कर्मचारी वर्ग. उपस्थित होते.

## पुन्हा एकदा : 'देशात नरेंद्र - राज्यात देवेंद्र' पर्व

क्रिकेट प्रमाणेच राजकारण, सत्ताकारण हा अनिश्चिततेचा खेळ आहे, सापशिडी प्रमाणे कोण अचानक वर जाईल आणि वरून खाली येईल याचा अंदाजच बांधता येत नाही, राजकारणात अनेकांना संधी मिळते मात्र त्याचे सोने करणे सगळ्यांनाच जमते असे नाही,अनेकांना राजकीय पार्श्वभूमी नसली तरी संधी मिळते काहींना घराणेशाहीच्या वारसाहक्काने संधी मिळते मात्र आपले कर्तृत्व सिद्ध करावेच लागते.२०१४ च्या लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीपूर्वी कोणालाही वाटले नसेल देवेंद्र फडणवीस यांचे राजयोग काय असतील, मात्र लोकसभा निवडणुकीत भाजपने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एकहाती विजय मिळवित देशात सत्तांतर घडवुन आणले तर नंतरच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने सर्वाधिक १२२ जागा जिंकल्या तर युती फुटल्याने शिवसेना एकटी लढली होती, तेव्हा निकाल लागत असतांनाच राष्ट्रवादी कॉंग्रेसने न मागता पाठिंबा जाहीर केला त्यामुळे भाजपचा मुख्यमंत्री होणार हे नक्की झाले होते मात्र तेव्हा मुख्यमंत्री पदासाठी ऐकनाथ खडसे, नितीन गडकरी यांच्या सारख्या जेष्ठ नेत्यांची नावे चर्चेत होती मात्र दिल्लीश्वरांच्या मनात काही वेगळेच होते आणि अनपेक्षितपणे देवेंद्र फडणवीस(४४) यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ पडली. तेव्हा पासून देवेंद्र फडणवीस हे दिल्लीश्वरांचे वंडरबॉय म्हणून ओळखले जाऊ लागले आणि 'दिल्लीत नरेंद्र - राज्यात देवेंद्र 'हे समीकरण बनले. मिळालेल्या संधीचे सोने करत देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीश्वरांच्या अपेक्षांना खरे ऊतरून पाच वर्षांची कारकिर्द पुर्ण केली. देवेंद्र फडणवीस यांची राजकीय सुरवात झाली ती नागपूर मधुन नगरसेवक नागपुरचे महापौर अशी एक एक पायरी चढत फडणवीस राजकीय यश मिळवत १९९९ मधे पहिल्यांदा आमदार झाले आणि सलग ते आमदार म्हणून निवडून येत आहे. २०१४ साली देशात सत्तांतर झाले आणि मोदी यांनी पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतली, तर त्याच वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आणि अगदी अनपेक्षितपणे देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्री पदाची माळ पडली. शरद पवार( ३८)यांच्या नंतर अगदी तरुण वयात (४४) वर्षी ते राज्याचे मुख्यमंत्री बनले. त्यावेळी' देशात नरेंद्र राज्यात देवेंद्र' हे सुत्रे चांगलेच गाजले. देवेंद्र फडणवीस हे दिल्लीश्वरांचे वंडरबॉय अशी त्यांची ओळख निर्माण झाली. आपल्या मुख्यमंत्री पदाच्या काळात त्यांनी अनेक यशाची शिखरे गाठली. बहुमत नसतांना आणि शिवसेनेबरोबर युती नसताना त्यांनी सरकार स्थापन केले, त्यांना छुपी मदत मिळाली ती राष्ट्रवादी पक्षाची. तर ऐकनाथ शिंदे हे विरोधी पक्षनेते बनले



मात्र अल्पावधीतच शिवसेना सरकार मधे सामील झाली, तुझे माझे जमेना तुझ्या वाचून करमेना अशा पद्धतीने फडणवीस सरकार ची पाच वर्षे पूर्ण झाली या काळात खुद्द ऐकनाथ शिंदे यांनी वैतागून राजीनामा देऊ होता आणि शिवसेनेचे सगळे मंत्री खिशात राजीनामे घेऊन फिरत होते, त्याच बरोबर पक्षांतर्गत विरोधक समजले जाणारे ऐकनाथ खडसे, विनोद तावडे, पंकजा मुंडे यांच्या महत्त्वाकांक्षेला व्यवस्थित हाताळले. ऐकनाथ खडसे यांना तर आयुष्यभर ज्या पक्षासाठी आपले आयुष्य खर्ची केले त्या भाजपला सोडचिठ्ठी द्यावी लागली आणि याचा दोष ते ऊघडपणे देवेंद्र फडणवीस यांना देतात,असे असले तरी एक ऊत्तम प्रशासक म्हणून त्यांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले गेल्या निवडणुकीत तर त्यांना चहूबाजूंनी खलनायक ठरवले गेले होते.

२०१९ साली भाजप - शिवसेनेची युती होती, निवडणुकीत युतीला स्पष्ट बहुमत मिळाले होते मात्र अनपेक्षितपणे बंद दरवाजा आड दिलेल्या शब्दावरून दोघांत बिनसले आणि या संधीचा फायदा घेत जाणत्या राजांनी वेगळाच राजकीय डाव मांडला, अनपेक्षितपणे शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेस या तीन पक्षांची 'मविआ' आघाडी बनली आणि ऊद्धव ठाकरे मुख्यमंत्री बनले,त्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला गेला. मावळत्या विधानसभेत भाषण करतांना देवेंद्र फडणवीस यांनी 'मी पुन्हा येईन' चा त्रिवार ऊच्चार केला मात्र त्यांचा मोहभंग झाला आणि ते विरोधी पक्षनेते बनले,' मविआ' चे सरकार स्थापन होण्या अगोदर ते अल्पकाळासाठी मुख्यमंत्री बनले, अजितदादांबरोबरचा पहाटेचा शपथविधी फारच गाजला होता. मात्र २०२२ मधे दिल्लीश्वरांच्या पाठिंब्याने त्यांनी आपली कलाकारी दाखवत ऐकनाथ शिंदे या ऊद्धव ठाकरे यांच्या शिलेदारालाच बंडखोरी करायला लावुन 'मविआ' चे सरकार पाडले. त्यावेळी फडणवीस हेच मुख्यमंत्री होतील असे सर्वांनाच वाटत होते मात्र त्यांनीच मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे हे सरकार स्थापन करतील आणि मी सरकारचा भाग रहाणार नाही असे जाहीर केले मात्र दिल्लि वरून आदेश येताच ऊपमुख्यमंत्री म्हणून सरकार मधे सामील झाले. २०२३ मधे पून्हा एकदा त्यांनी आपली कलाकारी दाखवत अजितदादा पवार यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातुन बाहेर काढले आणि थेट ऊपमुख्यमंत्री पदावर बसवले.गेल्या दहा वर्षांपासून राज्यातील भाजपचे सर्वेसर्वा म्हणून देवेंद्र फडणवीस यांचाच शब्द अंतिम मानला जातो, लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही याची खंत ठेवुन देवेंद्र फडणवीस यांनी रणनिती आखली आणि त्याचे फळ त्यांना भरभरून मिळाले. दिल्लीतील नेतृत्वाने देखील त्यांना सबका साथ, सबका विश्वास चा सल्ला दिला, त्यामुळे पंकजा मुंडे विधानपरिषदेवर गेल्या. कधी नव्हे एवढे यश भाजपने मिळवत तब्बल १३२ जागा जिंकल्या आपल्या पक्षाला जिंकुन दिल्याच मात्र आपले मित्र पक्ष असलेल्या शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला देखील घवघवीत यश मिळवून दिले.मावळत्या विधानसभेत तर त्यांनी अजब कामगिरी केली, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता अशा भुमिका त्यांनी बजावल्या. देवेंद्र फडणवीस हे संघाच्या मुशीतुन तयार झालेले सच्चे कार्यकर्ते आहेत, प्रथम राष्ट्, नंतर पक्ष आणि नंतर व्यक्ती ही मुल्ये मानणाऱ्या भाजपचे ते पाईक आहेत, पक्षाचा आदेश हा त्यांचासाठी सर्वतोपरी. भाजप आणि महायुतीला मिळालेल्या महायशाचे ते खरे शिल्पकार ठरले आहेत.भाजप, फडणवीसांबाबत, त्यांच्या कार्यपद्धतीबाबत कितीही मतभेद असले तरी पक्षाचा निष्ठावान कार्यकर्ता कसा असावा तर देवेंद्र फडणवीस यांच्या सारखा असावा. दिल्लीतील 'चाणक्य' यांच्या बरोबरीने देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्रातील 'ज्युनियर' चाणक्य म्हणून ओळखले जातात.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून आता ते तिसऱ्यांदा राज्याचे नेतृत्व करत आहेत, महाराष्ट्राला त्यांच्या कडुन फार अपेक्षा आहेत, महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, कायदा व सुव्यवस्था, महिलांची सुरक्षा, वाढती गुन्हेगारी, राज्याबाहेर विशेषतः गुजरातला जाणारे ऊद्योगधंदे, असे एक ना अनेक प्रश्न आहेत. राज्यावरील कर्जाचा डोंगर, वाढती आर्थिक तुट, याचा विचार राज्याचा गाडा हाकण्याचा मोठे आव्हान त्यांच्यापुढे आहे. केवळ विकासाचे आभासी चित्र रंगवुन चालणार नाही. त्यांनी मी पुन्हा आलो हे त्यांनी सिद्ध करुन दाखवले आणि आता पुन्हा एकदा 'देशात नरेंद्र- राज्यात देवेंद्र' चा कारभार सुरू झाला आहे.सबका साथ, सबका प्रयास, सबका विश्वास, असला तरच सबका विकास शक्य आहे.

**- अनंत बोरसे**

**शहापूर जिल्हा ठाणे ९१५८४९५०३७**

# निसर्गोपचार संस्थेला पदव्युत्तर अभ्यासक्रमाची परवानगी द्या

## खा.लंके यांची मंत्री प्रताप जाधव यांच्याकडे मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** पुणे येथील राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेला पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी परवाणगी देण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय आयुष मंत्री प्रताप जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे गुरूवारी केली.

मंत्री जाधव यांना देण्यात आलेल्या निवेदनात खासदार लंके यांनी नमुद केले आहे की, सन २०२१-२१ मध्ये कोरोना महामारीसाख्या भयंकर आजरावर मात करण्यासाठी आपण आपल्या मतदारसंघात १ हजार १०० बेडचे कोव्हीड सेंटर चालविले.

या कोविड सेंटरमध्ये नियमित उपचार पद्धतीबरोबरच आयुर्वेद, निसर्गोपचार व योगा अशा पद्धतीचा अवलंब करून उपचार करण्यात आले. त्यातून अनेक रूग्णांनी कोरोनावर मात केली. काही महिन्यांपूव आयुष मंत्रालयाच्या आखत्यारीत येणाऱ्या पुणे येथील राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेस भेट दिली असता संपूर्ण संकुलाची रचना तसेच उत्तम प्रकारचे नियोजन तिथे आहे.

या निसर्गोपचार संस्थेस दिलेल्या भेटी दरम्यान झालेल्या चर्चेतून पुढे आलेल्या गोष्टींनुसार या संस्थेस पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी देणे गरजेचे आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेने या संस्थेमार्फत देण्यात येणाऱ्या बीएनवायएस या पदवीच्या शिक्षणाचा कालावधी साडेपाच वर्षांचा करण्यात यावा, जेणेकरून या अभ्याक्रमाला इतर राज्यात ही मान्यता मिळू शकेल याकडे खा. लंके यांनी मंत्री जाधव यांचे लक्ष वेधले आहे. खा.लंके यांनी केलेल्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून निर्णय घेण्याची ग्वाही मंत्री जाधव यांनी यावेळी दिली.



डॉक्टर पदवीसाठी परवानगी द्या राज्य शासनाच्या ३१ जानेवारी २०१९ च्या निर्णयानुसार महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या मार्फत योग व निसर्गोपचार पदवी बीएनवायएस या अभ्यासक्रमाला मान्यता देण्यात आलेली आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व्यक्तीस डॉक्टर ही पदवी लावण्यास परवानगी देण्यात यावी. तामिळनाडू, कर्नाटक, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, तेलंगणा, गुजरात, राजस्थान या राज्यांमध्ये बीएनवायएस चा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर डॉक्टर ही पदवी लावण्यास परवानगी देण्यात आल्याचेही खा. लंके यांनी या निवेदनात नमूद केले आहे.

# थोडक्यात

## आ.गुट्टे, आ.पडळकरांना मंत्रिमंडळात समाविष्टीसाठी कार्यकर्त्यांनी लिहिले रक्ताने पत्र



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०५, पालम (परभणी) :** राज्यात नुकतेच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत दिली आहे. याच मंत्रिमंडळात आपल्या नेत्याची वर्णी लागण्यासाठी शहरातील मंगेश घोरपडे या कार्यकर्त्यांनी भाजपाचे नेते देवेंद्र फडवणीस यांच्याकडे रक्ताने लिहिलेले पत्र पाठवून मागणी केली. राज्यातील नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला राज्यातील जनतेने स्पष्टपणे कौल देत सत्ता देण्यात आली आहे. या मंत्रिमंडळामध्ये समावेश होण्यासाठी अनेक इच्छुक आपापल्या पद्धतीने काम करत आहेत. यामध्ये कार्यकर्ते ही मागे नसल्याचे दिसून येत आहे. होणाऱ्या मंत्रिमंडळात ओबीसीचे नेते आ.गोपीचंद पडळकर, राष्ट्रीय समाज पक्षाचे आ.रत्नाकर गुट्टे यांना या मंत्रिमंडळात समावेश करून त्यांना मंत्रिमंडळात चांगले दर्जाचे मंत्रीपद देण्यात यावे. यासाठी शहरातील मंगेश नरहरी घोरपडे यांनी भाजपा नेते देवेंद्र फडणीस यांच्याकडे रक्ताने लिहिलेले पत्र पाठवण्यात आले आहे.

# समाजाला मुक्ततेचे भान देणारे खरे शिक्षक म्हणजे महात्मा फुले - डॉ.श्रीपाल सबनीस

## सोपान बंदावणे यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.०५, पुणे :** राष्ट्रसेवा दल संचालित शिक्षण प्रशासक मंडळाच्या वतीने रावसाहेब पटवर्धन विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, साने गुरुजी प्राथमिक शाळा व बालक मंदिरच्या सर्व शिक्षक शिक्षक शिक्षकेतरांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस यांनी प्रतिपादन केले. अभिजनाची परंपरा जपणारे साने गुरुजी तसेच बहुजन वादाची परंपरा जपणारे महात्मा फुले यांचे योगदान असणाऱ्या या परिसरामध्ये असणाऱ्या शाळेतील शिक्षकांचा सन्मान महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनी होतोय ही फार मोठी अभिमानाची बाब आहे. शिक्षक हा समाजाचा निर्माता, समाज प्रवाहाला निर्मळ व स्वच्छ करण्याच्या कामात योगदान देणारा महत्त्वाचा घटक आहे. त्याला सातत्याने प्रश्न पडले पाहिजे.त्याने चिंतन केले पाहिजे, त्याचा एकच धर्म तो म्हणजे सत्याचा, ज्ञानाचा, विद्येचा आहे. शिक्षकाने विवेकवादी भूमिका बजावत शिक्षणाचे महान कार्य करावे. अशी अपेक्षा ही डॉ.सबनीस यांनी याप्रसंगी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव शिवाजी खांडेकर हे होते. सध्याचे सरकार शिक्षणाची जबाबदारी झटकत असल्याचे सांगत त्यांनी शिक्षण क्षेत्रातील अडचणींवर भाष्य केले.

याप्रसंगी व्यासपीठावर रावसाहेब पटवर्धन विद्यालयाच्या शाळा समिती अध्यक्ष अलका काळे, संस्थेचे संचालक प्रा.भगवान कोकणे, साने गुरुजी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मीना काटे, रावसाहेब पटवर्धन विद्यालयाचे पर्यवेक्षक जीवन इंगळे, सोपान बंदावणे, साने गृरुजी प्राथमिक शाळा समिती व व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, संस्थेचे संचालक प्रमोद दिवेकर, राष्ट्र सेवा दलाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते फैय्याज इनामदार आदी उपस्थित होते. प्रा.भगवान लक्ष्मण कोकणे यांच्या वतीने कै. लक्ष्मण कोकणे स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा गुणवंत शिक्षक पुरस्कार साने गुरुजी प्राथमिक शाळेचे शिक्षक सोपान बंदावणे यांना याप्रसंगी प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अलका काळे यांनी केले. उपस्थितांचे आभार जीवन इंगळे यांनी मानले तर सूत्रसंचालन वाझेदा मुलाणी यांनी केले.



## निफाड बस वेळेवर लागत नसल्याने प्रवाशाची होते गैरसोय

### अधिकारी करतात दुर्लक्ष; प्रवाशी वर्गाची नाराजी



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०५, पेण :** पेण तालुक्यात ग्रामीण भागातील निफाड - जावळी बस वेळेवर लागत नसल्याने अनेक प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या भागातील प्रवाशांची जाण्या येण्यासाठी एसटी बसला प्रवाशांची पसंती असते परंतु बस वेळेवर लागत नसल्याने प्रवाशांना ताटकळत तासनतास एसटी स्टँडवर उभे राहावा लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना, महिला वर्ग, नोकरदारवर्ग बसची प्रतीक्षा करावी लागतं आहे त्यामुळे एसटी महामंडळाचे अधिकारी जाणीवपूर्वक तर नाही ना उशिरा लावत ?, दरवेळीच कशी उशिरा बस लागते, असे अनेक प्रश्न प्रवाशी वर्गातून केले जात आहे. पेण पुर्व विभागातील जावळी निफाड भागातील विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी तालुका मुख्यलयातील शाळेत प्रवेश घेऊन शिक्षण विद्यार्थी घेत आहे परंतु शाळा सुटल्यानंतर वेळेवर बस लागत नसल्याने मोठा फटका शिक्षणावर बसत असल्याचे बोले जात आहेत तसेच अनेक महिला वर्ग सुद्धा नोकरदार वर्ग घर काम करण्यासाठी तालुक्यात काम करण्यासाठी येत असतात परंतु सकाळी काम आटपून घरी जाण्यासाठी अनेक महिला बस स्टँडला एसटी बसची तासनतास वाट पाहत असून सुद्धा बस लागत नसल्याने महिला वर्गातुन संताप व्यक्त करत आहेत.बसस्थानकावर प्रवासी गेल्यानंतर त्यांना समाधानकारक उत्तरे दिली जात नाहीत, बस नेमकी केव्हा येणार, केव्हा निघणार याची प्रवाशांना व्यवस्थित माहिती दिली जात नाही. सकाळी व संध्याकाळी प्रवाशांची मोठी गर्दी असते, त्या काळात बसची कमतरता असते. त्यामुळे बसने प्रवास करायचा म्हटल्यावर प्रवासाव्यतिरिक्त प्रतीक्षेचा कालावधी तासनतास वाट पाहावी लागते त्यामुळे एसटी महामंडळ अधिकारी व आगर प्रमुख यांनी तातडीने लक्ष वेधून वेळेवर बस लावण्याची मागणी प्रवाशी वर्गातून केली जात आहे.

# राज्यात भाजप महायुतीची सरकार स्थापन होताच जल्लोष

## खापरखेडयात ठिकठिकाणी आनंदोउत्सव साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, भाजप पक्षाध्यक्ष जे.पी.नड्डा आणि महायुती नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांचा शपथग्रहण सोहळा मुंबई येथीलआझाद मैदानावर हजारो नागरिकांच्या साक्षीने ५ नोव्हेंबर गुरुवारला सायंकाळी पार पडला.



राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होताच भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भानेगाव, खापरखेडा, चनकापूर, मिलन चौक, सिल्लेवाडा, रोहना, वलनी, दहेगाव रंगारी परिसरात एकच जल्लोष बघायला मिळाला. याप्रसंगी मुख्य बाजारपेठत विजयी मिरवणूक काढण्यात आली. शिवाय ठिकठिकाणी ढोल ताश्याच्या गजरात फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली.

यावेळी बटेंगे तो कंटेंगे, एक है तो सेफ है, मोदी है तो मुमकिन है, भारतीय जनता पार्टी महायुतीचा विजय असो, अभि तो झाकी है, जिल्हा परिषद और पंचायत समिती चुनाव बाकी है, आदि घोषणा देण्यात आल्या. यावेळी शेकडो कार्यकर्ते डीजे साउंडच्या गाण्यावर नाचत होते.

रॅलीत जेष्ठ नेते शांताराम गावंडे, रमेश जैन, राधाकिशन मित्तल, किशोर चौधरी, श्यामराव सरोदे, बबलू ठाकूर, क्रिष्णा यादव, चंद्रशेखर लांडे, विलास महल्ले, राजेश गायकवाड, चंद्रशेखर पानतावणे, नितीन पुरी, राहुल बागडे, प्रकाश लांजेवार, राजेश देशभ्रतार, नाना बांगळकर, रमेश लोढे, बालाजी हांडे, किशोर बक्सरिया, सुनील जालंदर, अनिल छाणिकर, ताराचंद फटींग, पंकज मोटघरे, अनिल काळे, कांशीराम परतेकी, महादेव आंबुलकर, तनु मित्तल, प्रकाश रंगढहाले,

कमलेश भास्कर, अरविंद चिकनकर, बालू पाठराबे, प्रणय कुंभारे, सरपंच शालिनी चवरे, उपसरपंच सोनू बोरकर, ग्रा.प.सदस्य दर्शना बोरकर, संगीता सिंघम, नीता जालंदर, आरती भांडारकर, विकास शिंदे, सदानंद ठाकरे, जय तिवारी, शीराम पन्नामी, नारायण गुरव, मनोहर उमाळे, गुणाजी खापरे, केशव मलवार, सुरेश बसुले, प्रभाकर उमाळे, राहुल बांगळकर, मधुकर मोटघरे, शीधर देशभ्रतार, शीकांत पांडे, रोहित गुप्ता, आनंद भगत, भूषण पाटील, आकाश पांडेकर, सुनील बागडे, रोहित गुप्ता, आनंद भगत, भूषण पाटील, सुनील बागडे, देऊ पाटील, देवंश बसेन आदि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## धानोरा तांडा येथे श्री दत्त जयंतीनिमित्त महाप्रसाद

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०५, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यातील धानोरा तांडा रेल्वे स्टेशन येथे श्री दत्त जयंती निमित्त १४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होम पुजा व महाप्रसादाचा भव्य कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक संत श्री बालब्रम्हचारी कैलास महाराज यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी महतं जितेन्द्र महाराज (पोहरादेवी), श्री संत रामराव महाराज नातू देवी भक्त शेखर महाराज (पोहरादेवी), संत देविदास बाबा (घानमुखी), संत लिंबाजी महाराज (दयाल धानोरा), संत गंगेश्वर महाराज (मदनापूर), संत प्रेमसिंग महाराज (धानोडा) यांच्या आशिर्वादाने संत बालब्रम्हचारी कैलास महाराज (धानोरा तांडा) यांनी दत्त जयंती निमित प्रती वर्षी प्रमाणे याही वर्षी दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता होम पुजा व महाप्रसाद व सांप्रदायीक भजनी मंडळाचा भव्य कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी सर्वे भाविक भक्तानी या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी धानोरा तांडा येथे उपस्थित राहावे असे आवाहान संत श्री बालब्रम्हचारी कैलास महाराज यांनी केले आहे.

# कोरठण खंडोबा गडावर उद्या चंपाषष्ठी उत्सव; अध्यक्षा घुले यांची माहिती

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथिल पुरातन सर्वांचे कुलदैवत व लाखो भाविकांचे आराध्य दैवत जागृत देवस्थान कोरठण खंडोबा गडावर शनिवार, दिनांक ०७ डिसेंबर रोजी चंपाषष्ठी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले असल्याची देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा शालिनी घुले यांनी दिली. चंपाषष्ठी निमित्त पहाटे चार वाजता खंडोबा मंगलस्नान महाभिषेक पार पडल्यानंतर चांदीची सिंहासन व चांदीच्या उत्सव मूर्तींचे सिंहासनावर अनावरण होईल. मूर्तींना विशेष साज शृंगार




सह पूजा व महाआरती पार पडेल. अन्नदाते दिपक लंके व जया लंके यांच्या हस्ते पूजा व आरती पार पडेल. गोरेगाव येथून आलेल्या पायी दिंडी सोहळ्याचे स्वागत करण्यात येणार आहे. दुपारी ११ वाजता अमरावती येथील पद्माकर देशमुख महाराज यांचा कीर्तन सोहळा पार पडेल. कीर्तन सेवा पुणे येथील सुरेश कोते यांच्या वतीने देण्यात आली आहे. दुपारी एक वाजता शाहीर विलास अटक व शाहीर नामदेव शिंदे यांच्या खंडोबाची गाण्यांची स्पर्धा होईल. त्यानंतर दुपारी २ वाजता खंडोबा चांदीची पालखी व चांदीच्या नविन उत्सव मूर्तींचे नवीन शाही रथातून मंदिर प्रदक्षिणा मिरवणूक काढण्यात येईल.

यावेळी सकाळी ११ वाजल्यापासून भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. महाप्रसादाचे नियोजन शंकर चिकणे, दादाभाऊ चिकणे, सचिन गोडसे, शिवाजी शेळके, शिवाजी बेलकर, साहेबराव चिकणे, विनोद गोडसे, प्रकाश चिकणे, नितीन चिकणे, गोरख चिकणे यांच्यावतीने करण्यात आले आहे. मंदिर रंगकामासह विविध विकासकामांसाठी भाविकांनी देणगी स्वरुपात मदत करावी असे आवाहन उपाध्यक्ष महेश शिरोळे, अशोक घुले, विश्वस्त ॲड. पांडुरंग गायकवाड, राजेंद्र चौधरी, चंद्रभान ठुबे, जालिंदर खोसे, कमलेश घुले, सुवर्णा धाडगे, अजित महांडूळे, रामचंद्र मुळे,धोंडीभाऊ जगताप, सुरेश फापाळे, दिलिप घुले, महादेव पूंडे, तुकाराम जगताप यांनी केले आहे.

## व्ही.पी.एम. कन्नड हायस्कूल, कनिष्ठ महाविद्यालयात 'टी' वॉर्डचे विज्ञान प्रदर्शन

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.०५, मुलुंड (मुंबई) :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातर्फे 'टी' वॉर्ड विभागाचे विज्ञान प्रदर्शन ११ ते १३ डिसेंबर २०२४, सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत मुलुंड (पूर्व) येथील व्हि.पी.एम. कन्नड हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित केले जाणार आहे. या प्रदर्शनात 'टी' वॉर्डमधील १०० शाळांचा सहभाग असेल आणि २३० पेक्षा जास्त नवीन प्रकल्प प्रदर्शित केले जाणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.मुश्ताक शेख, शिक्षण निरीक्षक, उत्तर विभाग, मुंबई, यांच्या हस्ते ११ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता होणार आहे. ३ दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात विद्यार्थी आणि शिक्षकांना त्यांचे प्रकल्प, प्रतिकृती आणि शिक्षण साहित्य प्रदर्शित करण्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमाच्या विशेष आकर्षणांपैकी एक म्हणजे प्रो. अशोक नगरहल्ली, अहमदाबाद येथील माजी वरिष्ठ प्राध्यापक, खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र यांचे व्याख्यान. या वर्षाची संकल्पना शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान आहे, ज्याचे उद्दिष्ट सहभागींना जागतिक आव्हानांसाठी नवीन उत्तरे शोधण्यास प्रोत्साहित करणे होय. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना त्यांची प्रतिभा प्रदर्शित करण्याचे आणि त्यांचे वैज्ञानिक स्वभाव जोपासण्याचे व्यासपीठ प्रदान करण्याचा प्रयत्न करतो.